# प्रेसनोट

दि. १७/०५/२०२४

**बारामती तलाठी कार्यालय, ता. बारामती, जि. पुणे येथील खाजगी इसमावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३४ वर्षे |
| आरोपीचे नाव व पत्ता | श्री. चंद्रकांत परबत जावळकर, वय ५० वर्ष, रा. कुंभारवस्ती, कसबा, तालुका - बारामती, जिल्हा - पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- रुपये (तीन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १६/०५/२०२४ व दि. १७/०५/२०२४ |
| सापळा दिनांक | १७/०५/२०२४ |

ठिकाण :- बारामती तलाठी कार्यालयाचे बाहेर, प्रशासकीय इमारतीचे आवारात, ता. बारामती, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार यांचे सास-याच्या नावावरील कसबा बारामती येथील जागेवर तक्रारदार यांच्या पत्नीची वारस नोंद लावण्यासाठी तक्रारदार यांनी बारामती तलाठी कार्यालय येथे अर्ज दाखल केला होता. सदरची वारस नोंद लावण्यासाठी खाजगी इसम चंद्रकांत जावळकर यांनी तलाठी बारामती यांच्यासाठी ५,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, खाजगी इसम चंद्रकांत जावळकर यानी तलाठी बारामती यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे त्यांच्या पत्नीची वारस नोंद करण्यासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती ४,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, खाजगी इसम चंद्रकांत जावळकर यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ३,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.